महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/प्रवेश/२०२०/१९४८ दिनांक : १९.०६.२०२०

प्रति
मा अध्यक्ष / सचिव,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विना अनुदानीत संस्था.

विषय - **Covid-19**_विषाणूच्या संसर्गामुळे उदभवलेल्या संकटकालिन परस्थितीत शिक्षण शुल्कात व इतर शुल्कात वाढ न करणेबाबत...

संदर्भ : १. मा. अमित खरे, (भा.प्र.से.) सचिव, उच्चत्तर शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ. शा. पत्र क्र १३-१/२०२०-टीसी, दिनांक २९/०४/२०२०
२. मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म रा मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०२०/१७३ दिनांक १८/०६/२०२०.

मा. अमित खरे, (भा.प्र.से.) सचिव, उच्चत्तर शिक्षण विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली यांनी देशातील सर्व राज्ये व केंद्रशाशित प्रदेश यांचे मा. मुख्य सचिवांना उददेशून लिहिलेल्या पत्रात नमूद केल्यानुसार सध्या **Covid-19**_ या विषाणूच्या संसर्गामुळे उदभवलेल्या महामारीच्या जागतिक आरोग्य संकटातून आपण सर्वजण जात आहोत. दुस-या महायुध्दानंतर उद्भवलेली करोना संसर्ग संकटाची अभूतपूर्व परिस्थिती समाजातील सर्व घटकांवर खोल अर्थिक परिणाम करणारी ठरलेली आहे. हि वस्तूस्थिती विचारात घेता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शिक्षण शुल्क किंवा इतर शुल्कामध्ये कोणतीही वाढ करु नये असे आवाहन केले आहे. सदर पत्रात केलेल्या सुचनेनुसार राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांना आवाहन करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये शिक्षण शुल्क किंवा इतर शुल्कामध्ये कोणतीही वाढ करु नये.

प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे